**ठळक बातम्या**

- पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवून त्यांना तात्काळ परत पाठवण्यासाठी पावलं उचलण्याच्या केंद्रीय गृहमंत्र्यांच्या सर्व राज्यांना सूचना
- जम्मू-काश्मिर विधानसभेचं सोमवारी विशेष अधिवेशन, लष्कर प्रमुखांनी घेतला सुरक्षा व्यवस्थेचा आढावा
- स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल कुठलंही अवमानकारक वक्तव्य न करण्याची सर्वोच्च न्यायालयाची राहुल गांधी यांना ताकीद
- पोप फ्रान्सिस यांच्यावर उद्या व्हॅटिकन सिटीमध्ये अंत्यसंस्कार, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यावेळी उपस्थित राहणार

**आणि**

- ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि इस्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांचं निधन

<><><><><>

पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवून त्यांना तात्काळ परत पाठवण्यासाठी पावलं उचलण्याच्या सूचना केंद्र सरकारनं सर्व राज्यांना केल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन हा संदेश दिला.
राज्यातल्या पाकिस्तानी नागरिकांची यादी तयार झाली आहे. त्यांनी तात्काळ देश सोडावा यासाठी प्रयत्न केले जातील, दिरंगाई झाल्यास कारवाई होईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिला आहे.

<><><><><>

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानबरोबरच्या सिंधु पाणी वाटप कराराविषयी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नवीदिल्लीत उच्चस्तरीय बैठक घेतली. शाह यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ.

एस जयशंकर, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

<><><><>

जम्मू काश्मीरमध्ये नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी येत्या सोमवारी राज्य विधानसभेचं अधिवेशन बोलावलं आहे.

सिन्हा यांनी आज श्रीनगरमधल्या राज भवनात लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्यासोबत राज्यातल्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला. उत्तर कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल एम व्ही सुचिंद्र कुमार आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. लष्करप्रमुख द्विवेदी यांनी आज सकाळी श्रीनगरला आल्यावर सुरक्षा स्थितीचा परामर्श घेतला तसंच नियंत्रण रेषेदरम्यान पाकिस्तानकडून होत असलेल्या शस्त्रसंधी उल्लंघनाबाबत माहिती घेतली. पहलगाम इथल्या घटनास्थळालाही त्यांनी भेट दिली.

<><><><>

पाकिस्तानाचा पाठिंबा असलेल्या खलिस्तानी अतिरेक्यांकडून होत असलेल्या शस्त्र आणि अंमलीपदार्थ तस्करीचा छडा लावण्यासाठी NIA नं आज ६ राज्यात छापे टाकले. पंजाब, जम्मू - काश्मिर, राजस्थान, मध्य प्रदेश, बिहार आणि कर्नाटकमध्ये टाकलेल्या या छाप्यात अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरण आणि इतर साहित्य जप्त करण्यात आली.

<><><><>

पहलगाम इथल्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारनं पाकिस्तानविरोधात जाहीर केलेल्या उपाययोजनांना काँग्रेसचा पाठिंबा आहे, याचा पुनरुच्चार विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केला.

त्या आधी त्यांनी श्रीनगरमध्ये जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची भेट घेतली. दहशतवादाचा कणा मोडून

टाकण्यासाठी राज्य सरकारला आवश्यक ती सर्व मदत करण्याचं आश्वासन गांधी यांनी दिलं. हल्ल्यात जखमी झालेल्या नागरिकांची भेट घेऊन त्यांनी विचारपूस केली.

<><><><>

ब्रिटनचे प्रधानमंत्री केअर स्टार्मर आणि नेदरलँड्सचे प्रधानमंत्री डिक शूफ यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवरून संपर्क करून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला. या कठीण प्रसंगात ब्रिटन भारताच्या जनतेसोबत असल्याचं स्टार्मर यांनी सांगितलं. हा दहशतवादी हल्ला हा अत्यंत भ्याड असल्याचं नेदरलँड्सचे प्रधानमंत्री म्हणाले.

<><><><>

पहलगामला झालेल्या दहशतवादी हल्ल्याची माहिती इतर राष्ट्रांना समजावी, या दृष्टीनं भारतानं एक व्यापक राजनैतिक मोहीम हाती घेतली आहे. परराष्ट्र मंत्रालयानं काल काही देशांच्या राजदूतांना बोलावून या हल्ल्याची माहिती दिली होती. आज अमेरिका, इस्राएल आणि स्पेनच्या राजदूतांना बोलावून माहिती दिली. या कसोटीच्या काळात इस्राएल भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असं भारतातले इस्राएलचे राजदूत रुवेन अझर यांनी सांगितलं.

<><><><>

२०४७ पर्यंत विकसित भारताचं ध्येय गाठण्यासाठी पोलाद उद्योगानं पुढाकार घ्यावा असं आवाहन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी केलं आहे. ते आज मुंबईत इंडिया स्टील २०२५ आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेत बोलत होते.

स्टील उद्योग भारताच्या, संकटात टिकण्याच्या क्षमतेचं प्रतीक असावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सरकार अनेक विकसित देशांशी FTA, अर्थात मुक्त

व्यापार करार करण्याच्या प्रक्रियेत असून, त्यामुळं भारतीय स्टीलच्या निर्यातीला चालना मिळेल. असं गोयल यांनी सांगितलं.

कालपासून मुंबईत सुरु असलेल्या या परिषदेला, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज दूरस्थ पद्धतीनं संबोधित केलं. गेल्या दहा वर्षात पायाभूत सुविधा आणि कारखानदारीला केंद्रसरकारनं चालना दिल्यामुळे भारतीय रेल्वेमधे पोलादाची मागणी अनेक पटीनं वाढली आहे, असं त्यांनी सांगितलं. उद्योगांनी त्यांच्या गरजा सांगितल्या, तर त्या अधिक चांगल्याप्रकारे पूर्ण करण्याच्या दृष्टीनं आम्हाला उत्पादन करता येईल, असं ते म्हणाले.

भारताला ग्रीन स्टील अर्थात कार्बन उत्सर्जन आणि वातावरणावरचा परिणाम कमी करणाऱ्या शाश्वत पद्धतीनं उत्पादित केलेल्या पोलादाची जागतिक राजधानी बनवण्याचं आवाहन केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी या परिषदेत केलं. तर, आपल्या अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी गरज पडली तर पोलाद उत्पादनाला मोठा वाव असल्याचं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितलं.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल कुठलेही अवमानकारक वक्तव्य करु नका अशी ताकीद सर्वोच्च न्यायालयानं विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना दिली आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये भारत जोडो यात्रेदरम्यान अकोल्यात झालेल्या सभेत त्यांनी सावरकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. त्यासंदर्भात न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि मनमोहन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. यापुढे स्वातंत्र्य सैनिकांबद्दल अशाप्रकारची वक्तव्य केली तर न्यायालय स्वतःहून कारवाई करेल, अशा इशाराही खंडपीठानं दिला. यापुढे अशी वक्तव्य करणार नाही, असं आश्वासन राहुल गांधी यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी न्यायालयाला दिलं. त्यानंतर न्यायालयानं गांधी यांना बजावलेल्या समन्सला स्थगिती दिली.

सर्वोच्च न्यायालयाने स्वातंत्र्यवीर सावरकरांवरून राहुल गांधी यांना लगावलेल्या चपराकीनंतर ते यापुढे स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान करणार नाहीत, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केली आहे.

<><><><><>

पोप फ्रान्सिस यांच्यावर उद्या व्हॅटिकन सिटीमध्ये अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर उद्या देशभरात दुखवटा पाळण्यात येणार आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यासाठी आज व्हॅटिकन सिटीमध्ये पोहोचल्या आहेत. त्यांच्यासोबत संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, अल्पसंख्याक व्यवहार राज्यमंत्री जॉर्ज कुरियन आणि गोवा विधानसभेचे उपसभापती जोशुआ डीसूझा आहेत. राष्ट्रपती मुर्मू  उद्या सेंट पीटरच्या बॅसिलिका येथे पुष्पहार अर्पण करून पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली वाहून अंत्यसंस्कारात सहभागी होतील, असं परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे.

<><><><><>

इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉक्टर कृष्णस्वामी कस्तुरीरंगन यांचं आज बेंगळुरू इथे त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. त्यांना पद्म श्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या नागरी सन्मानांनी गौरवण्यात आलं होतं.

ते १९९४ पासून २००३ पर्यंत इस्त्रोचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. कस्तुरीरंगन यांनी पीएसएलव्हीच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. तसंच, त्यांच्या कार्यकाळात चांद्रयानासारख्या मोठ्या मोहिमांचं नियोजन करण्याची सुरुवात झाली होती. निवृत्तीनंतर त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलपती आणि कर्नाटक ज्ञान आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिलं. उच्च शिक्षण, तंत्रज्ञान आणि पर्यावरणासारख्या विविध विषयांवर सल्लागार म्हणून त्यांनी काम केलं होतं. डॉ. कस्तुरीरंगन यांनी मुंबई विद्यापीठातून भौतिकशास्त्रात पदवी आणि पदव्युत्तर पदवी

घेतली होती. १९७१ मध्ये अहमदाबाद येथील भौतिक संशोधन प्रयोगशाळेत काम करताना प्रायोगिक उच्च ऊर्जा खगोलशास्त्र या विषयात त्यांनी डॉक्टरेट मिळवली होती.

डॉ. कस्तुरीरंगन यांनी इस्रोचे प्रमुख म्हणून भारताच्या अंतराळ कार्यक्रमाच्या उत्क्रांतीत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करण्यासाठी जे काम केलं, त्यामुळे पुढच्या पिढीच्या जडणघडणीसाठी उपयुक्त ठरत असल्याची भावना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही कस्तुरीरंगन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

१९९५ च्या वक्फ कायद्याचा गैरवापर, आणि सरकारी जमिनींवर अतिक्रमण रोखण्यासाठी, तसंच वक्फच्या कारभारात पारदर्शिता आणण्यासाठी वक्फ सुधारणा कायदा केल्याचं केंद्रसरकारने म्हटलं आहे. वक्फ सुधारणा कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आज केंद्रसरकारने प्राथमिक जबाबाचं प्रतिज्ञापत्र दाखल केलं.

<><><><><>

आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर यांनी इंडिया ऑडिओ परिषद आणि पुरस्कार समारंभाला आज मुंबईत संबोधित केलं. यावेळी त्यांनी ऑडिओ माध्यमातली क्रांती आणि त्यातलं आकाशवाणीचं योगदान यावर भाष्य केलं. लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी आकाशवाणी कटीबद्ध असल्याचं त्या यावेळी म्हणाल्या.

//<><><><><>//